मूल्यवर्धन

# प्रेरणा

महाराष्ट्र संवादपत्र २ – जुन २०१९



## मा. शिक्षण आयुक्त यांचा संदेश



राज्याचा मानबिंदू ठरलेला मूल्यवर्धन कार्यक्रम यावर्षी लवकरच राज्यातल्या सर्व जिल्हा परिषद शाळांपर्यंत पोहोचत आहे. जास्तीत जास्त मार्क मिळवण्याच्या स्पर्धेच्या युगात हा कार्यक्रम मूल्ये रुजविण्याकडे शाळा आणि समाजाचे लक्ष ठळकपणे वेधण्याचे काम करीत आहे. संविधानातली मूल्ये प्राथमिक शाळेतल्या अगदी लहान मुलांपर्यंत मोकळ्या वातावरणात आणि त्यांना आवडेल अशी शिक्षण पद्धती वापरून पोहोचविणारा आणि सहयोग तसेच लोकशाहीची बीजे पेरणारा हा आगळा वेगळा कार्यक्रम आहे. म्हणूनच शासनाने हा कार्यक्रम स्वीकारून त्याला पूर्ण पाठबळ दिले आहे. राज्याने निर्धारित केलेल्या विषयवार अध्ययन निष्पत्तींपैकी काही महत्वाच्या निष्पत्ती साध्य होण्यासाठी देखील मदत या कार्यक्रमाची होणार आहे.

या कार्यक्रमाबाबत विविध घटकांशी मुक्त संवाद साधण्यासाठी 'मूल्यवर्धन प्रेरणा' हे नियतकालिक सुरु केले आहे. हा एक स्तुत्य उपक्रम आहे, या माध्यमातून मला असे सांगावेसे वाटते, की या वर्षी आपल्याला हा कार्यक्रम अधिक उंचीवर पोहोचविण्याची सुवर्णसंधी आहे. शाळास्तरावर वैयक्तिक आणि एकत्रित विचारमंथन, सराव, स्वयं–मूल्यमापन, पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत लोकशाही पद्धतीने संवाद आणि निर्णय, नियमित आढावा, आदान–प्रदान, प्रोत्साहन या गोष्टी घडल्या तर हे निश्चितपणे शक्य आहे. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये समृद्ध सहजीवन आणि सहयोगाने परस्पर प्रगती साधण्याचे पासवर्ड आहेत. संविधानाने पाहिलेले हे स्वप्न मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या माध्यमातून साकार करण्याच्या कामी सर्व शिक्षक बंधू–भगिनी आणि सहयोगी अधिकारी वर्ग यांनी सक्रीय सहभाग देऊन यशस्वी व्हावे यासाठी सर्वांना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**मा. श्री. विशाल सोलंकी (I.A.S.)**
**आयुक्त (शिक्षण) तथा संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.**

### या संवादपत्रात हे पहाल :


| | |
|---|---|
| मा. शिक्षण आयुक्त यांचा संदेश | १ |
| मूल्यवर्धन परिणामकारक अंमलबजावणीसाठी आढावा बैठक | १ |
| केंद्रप्रमुखांच्या ३०० हून अधिक शाळांना भेटी | १ |
| अधिकारी वर्गांचे अभिप्राय | २ |
| शिक्षकांच्या नजरेतून | ३ |
| मूल्यवर्धन यशोगाथा | ४ |
| SMF मास्टर ट्रेनरचे मनोगत | ५ |
| मूल्यवर्धन शिक्षकांसाठी | ५ |
| मूल्यवर्धन वार्ता | ६ |
| वृत्तपत्रांनी घेतलेली दखल | ७ |
| मान्यवरांचे अभिप्राय | ८ |


## मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठीची आढावा

मूल्यवर्धन कार्यक्रमाची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मा. नामदार श्री. आशिष शेलार (मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग), मा. नामदार श्री. विनोद तावडे (मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग), मा. वंदना कृष्णा (अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग), श्री.विकास गरड (उपसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे) आणि श्री. शांतिलाल मुथ्था (संस्थापक, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, पुणे) यांची आढावा बैठक झाली.



मान्यवरांकडून मूल्यवर्धन कार्यक्रम स्तुत्य आणि कौतुकास्पद आहे असे व्यक्त केले गेले आणि या कार्यक्रमासाठी आवश्यक ते हरप्रकारे साहाय्य करण्याचे आश्वासनही दिले गेले. श्री. शांतिलाल मुथ्था यांनी उपस्थित मान्यवरांना मूल्यवर्धन कार्यक्रमाअंतर्गत मागील वर्षाअखेरीस ४०००० शाळांमध्ये उपक्रम सुरु आहेत आणि यावर्षी उर्वरित २७००० शाळांमध्ये कार्यक्रम सप्टेंबर अखेरीस सुरु होईल व या सर्व ६७००० शाळांमधील इयत्ता १ली ते ५वी च्या सर्व विद्यार्थ्यांसोबत उपक्रम घेतले जातील याविषयी माहिती दिली. याखेरीज इयत्ता ६वी ते १०वी पर्यंतच्या सर्व इयत्तांचाही समावेश पुढील शैक्षणिक वर्षात सुरु करण्याबाबत सुचविले.

## केंद्रप्रमुखांच्या ३०० हून अधिक शाळांना भेटी

मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये प्रशासनाकडून होणारा पाठपुरावा हा एक महत्वाचा घटक आहे. प्रशासनाच्या फळीतील शाळेच्या सर्वात जवळ असणारी व्यक्ती म्हणजे केंद्रप्रमुख. त्यामुळे केंद्रप्रमुखांनी वेळोवेळी शाळेला भेट देणे आणि त्यांच्या निर्दशनास येणाऱ्या विशेष बाबी नोंदवणे अतिशय महत्वाचे आहे. त्यासाठी डाएट च्या सहयोगाने केंद्रप्रमुखांसाठी फेब्रुवारी ते मार्च २०१९ दरम्यान काही प्रशिक्षणे आयोजित करण्यात आली होती. ह्यामध्ये शाळा भेटी दरम्यान त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत, मोबाईल चत–अॅ चा वापर कसा करावा आणि कुठले फॉर्म भरावे ह्याबद्दल चर्चा करण्यात आली.

ह्या प्रशिक्षणाच्या उपयुक्ततेची प्रचिती शाळा भेटी दरम्यान आली. केंद्रप्रमुखांनी अल्पावधीतच जवळपास ३०० हून अधिक शाळांना भेटी दिल्याची नोंद झाली.ह्या प्राथमिक नोंदी असल्या तरी, ह्याच उत्साहात केंद्रप्रमुख सहभागी झाल्यास अपेक्षित उद्दिष्ट गाठता येईल. केंद्रप्रमुखांनी ह्या भेटींना महत्व दिल्यास मूल्यवर्धन हा कार्यक्रम अधिक प्रभावीपणे प्रत्येक मुलापर्यंत पोहोचू शकेल ह्यात शंका नाही.

*ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते, या ज्ञानाचे मंदिर हे, सत्य शिवाहून सुंदर हे.......*



नमस्कार ,

सत्य काय आहे यापासून ज्या कार्यक्रमाची सुरुवात आहे, ज्याची वलये स्वयंप्रकाशित होत आहेत असा हा मूल्यवर्धन कार्यक्रम आहे. प्रायोगिक तत्वावर सुरु झालेल्या या उपक्रमाची गुणवत्ता ही आता आंतरराष्ट्रीय मानकांद्वारे सिद्ध होत आहे, ही आपणासाठी अभिमानाची बाब आहे. मूल्यवर्धन हा कार्यक्रम जरी शासनाने स्वीकारला असला तरी शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने आता आपली ह्या कार्यक्रमाबाबतची जबाबदारी संपली असे न मानता, शासनाला आवश्यक ती मदत करणे हे आपले कर्तव्य मानले. देशातील भावी नागरिक सुजाण व संवेदनशील बनवण्यासाठीचा दूरगामी विचार यात दिसून येतो. या विचाराला अनुसरून जाणीवपूर्वक प्रयत्न करताना राज्यघटनेतील मूल्ये व मूल्यवर्धनमधील आठ मूल्ये यांची विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातील गाभाघटक व जीवनकौशल्ये यांच्यासोबत सांगड घातलेली दिसून येते. मूल्यांची रुजवणूक होताना, बालकांसाठी पाठ्यक्रमातील उद्दिष्टांच्या अपेक्षित बदलांचा आणि त्याकरिता मूल्यमापन व आनंददायी शिक्षण, या सर्वांचाच अतिशय सूक्ष्मपणे सारासार विचार, उपक्रमरुपी साहित्य तयार करताना केलेला, प्रकर्षाने दिसून येतो. त्याची अंमलबजावणी प्रत्यक्ष करणाऱ्या शिक्षकासाठीही, इयत्तानिहाय पुस्तक संच तयार केलेला आहे. उपक्रमाची मार्गदर्शिका व स्वतंत्र पुस्तिका, पुस्तकाचा दर्जा, जे शिक्षक हा उपक्रम राबवणार आहेत त्यांच्याकरिता प्रशिक्षणे, प्रशिक्षणात मार्गदर्शन करणारे प्रेरक म्हणून सन्मान, संस्थेचे तालुका समन्वयक व त्यांचे शिस्तबद्ध नियोजन अशा अनेक बाबी मूल्यवर्धन कार्यक्रमातील कौतुकास्पद आहेत.

गेली दोन वर्ष सोलापूर जिल्ह्यात मूल्यवर्धन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचे काम झाले आहे. पहिल्या टप्प्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, सांगोला व उत्तर सोलापूर या तीन तालुक्यातील १ ते ४ चे शिक्षक व केंद्रप्रमुख सहभागी झाले होते. दुसऱ्या टप्प्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये उर्वरित ८ तालुके व मनपा मधील १ ते ४ चे शिक्षक व केंद्रप्रमुख तसेच नव्याने बदली होऊन आलेल्या १ ते ४ च्या शिक्षकांचे प्रशिक्षण, यशस्वीरित्या पूर्ण झाले. अतिशय दूरगामी विचार ठेऊन राबवीत असलेल्या या कार्यक्रमाची फलनिष्पत्ती ही नक्कीच सकारात्मक व समाजोपयोगी असेल. 'एकमेकां साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' ही भावना विकसित होऊन विस्तारेल आणि 'मी' पासून सुरु झालेला प्रवास 'कुटुंब, समाजातून हे विश्वची माझे घर' या विचारधारेपर्यंत नेला जाईल अशा ह्या कार्यक्रमास आम्हा सर्वांच्या मनापासून शुभेच्छा.....!

**श्रीमती जे. डी. मेटे,**
**प्राचार्या, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, सोलापूर**

*शिक्षणातून सामाजिक एकता*



नाशिक जिल्ह्यात मूल्यवर्धन कार्यक्रमाची सुरुवात शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ला इगतपुरी तर २०१८-२०१९ मध्ये नाशिक ग्रामीण, नाशिक शहरी, चांदवड, सिन्नर, निफाड येथे झाली. नाशिक जिल्ह्यात एकूण १८ तालुके असून ६ तालुक्यात सध्या मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु आहे. तर इतर तालुक्यात २०१९-२०२० मध्ये इ. १ ते ५ वी करिता, मराठी माध्यमासोबत उर्दू, हिंदी, इंग्रजी माध्यमांमध्येही सुरु होणार आहे. त्यादृष्टीने मूल्यवर्धन अभ्यासक्रमाची पुस्तकेसुद्धा प्रत्येक तालुक्यात पोहोचली आहेत.

मूल्यशिक्षण ही कासवगतीने शिकण्याची प्रक्रिया आहे हे पालकांनी लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या पाल्यांच्या विकासासाठी वेळ देणे खूप गरजेचे आहे. शिक्षकांनी आत्मपरीक्षण करून प्रत्येक विद्यार्थ्याला शिकविले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडी, अभिरुची, कल लक्षात घेऊन त्याला योग्य त्या ठिकाणी मदत करणे महत्वाचे असते. विद्यार्थ्यांमध्ये जो बदल होत असतो तो पालकांनी सकारात्मक दृष्टीने स्वीकारणे खूप महत्वाचे असते.

शिक्षणाचा मुख्य उद्देश माणूस घडविणे हा आहे. घटनेतील मूल्यांची जेव्हा मुलांमध्ये खऱ्याअर्थाने रुजवणूक होईल आणि मुले बाहेरील समाजात सुजाण व जबाबदार नागरिक म्हणून वावरतील. तेव्हा खऱ्याअर्थाने समाजात चांगले वातावरण निर्माण होऊन समाज एका विशिष्ट दिशेने प्रगतीपथाकडे वाटचाल करेल. मूल्याधिष्ठीत शिक्षण हे प्राथमिक शिक्षणामध्ये खूप महत्वाची भूमिका निभावत आहे. सक्षम नागरिक व भावी समाज घडवण्यासाठी शाळेतील अभ्यासक्रमात मूल्यवर्धन असायलाच पाहिजे.

**डॉ. वैशाली झनकर,**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. नाशिक**



**मा. श्री. सचिन खुडे,**
**गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती उमरखेड, जिल्हा परिषद यवतमाळ**

महाराष्ट्र राज्यामध्ये 'महाराष्ट्र शासन व शांतिलाल मुथ्था फाऊंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता महत्वाकांक्षी असा मूल्यवर्धन कार्यक्रम शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून यवतमाळ जिल्हयातील उमरखेड तालुक्यात आनंदी वातावरणामध्ये सुरू आहे. या उपक्रमामध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या बालमनावर घटनात्मक मूल्यांची रूजवणूक होऊन बालकांमध्ये स्वयंशिस्त, स्वजाणीव, बंधुताभाव निर्माण होऊन लोकशाहीभिमुख नागरिक बनण्यासाठी नक्कीच मदत होत आहे. मूल्यवर्धन उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांसाठी इयत्तानिहाय उपक्रमपुस्तिका शासनामार्फत उपलब्ध करून दिली आहे. त्याचा वापर करून सदर कार्यक्रमाची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. तालुक्यातील ४३४ शिक्षक उत्कृष्ट पद्धतीने मूल्यवर्धन प्रशिक्षण पूर्ण करून आपल्या शाळास्तरावर विद्यार्थ्यांसोबत उपक्रम घेत आहेत. शिक्षकांनी घेतलेल्या उपक्रमाचे फोटो-व्हिडीओ तसेच MV-App द्वारे सोशल मिडियामुळे सर्वांपर्यंत पोहचतात ज्यामुळे त्यांना सकारात्मक प्रसिद्धी मिळते. चालू शैक्षणिक वर्षामध्ये प्रशासकीय बदलीने हजर झालेल्या ३६ शिक्षकांचे, तसेच उर्दू माध्यमाच्या शिक्षकांचेसुद्धा प्रशिक्षण झाले आहे.

मूल्यवर्धन तालुका समन्वयक श्री. उद्धव खेडकर यांचे काम उत्कृष्ट असून तालुक्यातील सर्व शाळांना किमान दोनदा भेटी देऊन झालेल्या आहेत. प्रशिक्षण कार्यात स्वत: पूर्ण वेळ उपस्थित राहून सर्व प्रशिक्षणार्थी शिक्षकांना खेळीमेळीच्या वातावरणात प्रशिक्षण पूर्ण करणेकामी प्रोत्साहित केल्याचे प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले. सदर प्रशिक्षण तसेच हा उपक्रम पुढील काळामध्येसुद्धा उमरखेडमधील सर्व शाळांमध्ये राबविणेबाबत अपेक्षा व्यक्त करून प्रशिक्षणाच्या दर्जाबद्दल समाधान व्यक्त केले.

सदर उपक्रम, त्या अंतर्गत घेतले गेलेले प्रशिक्षण व त्यानंतर प्रत्यक्ष शाळांमध्ये शिक्षकांनी घटनात्मक मूल्ये रूजविण्यासंबंधित केलेले काम व तालुका समन्वयक श्री. खेडकर यांचा गटसमन्वयकम्हणून सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्याशी असणारा समन्वय हा नक्कीच घटनेच्या मूल्यांप्रती विद्यार्थ्यांमध्ये जिव्हाळा निर्माण करणारा ठरला आहे. सदर उपक्रमास खूपखूप शुभेच्छा व शांतिलाल मुथ्था फाऊंडेशने सदर उपक्रमाकरिता उमरखेड तालुक्याची निवड केल्याबद्दल आभार!

## मूल्यवर्धनची किमया

**श्रीमती नीलम नामदेव भुतकर,**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, झाडाचीवाडी, ता.मुळशी, जि.पुणे.



शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या वतीने मागील वर्षापासून मूल्यवर्धन नावाचा उपक्रम आम्ही आमच्या शाळेत राबवीत आहोत. संपूर्ण महाराष्ट्रभर या कार्यक्रमाचे जाळे पसरत आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमुळे मी शिक्षक म्हणून काही बदलांना सामोरे गेले.
मूल्यशिक्षण हा विषय गाणी आणि सामान्यज्ञानातून शिकविण्याचा नाही. मुळातच हा विषय आजीच्या तोंडी ऐकलेल्या गोष्टीतून आपण शिकत गेलो, जे मोठयांनी सांगितले ते शिरसावंद्य मानून करत गेलो; त्या वागण्यामागील कारणे मोठे झाल्यावर कळत गेली. आजची पिढी मात्र संगणकाच्या काळातली आहे. तर्काच्या कसोटीवर प्रत्येक गोष्ट तपासून पाहणारी आहे. संवेदनशीलता हा दुर्मिळ होत जाणारा गुण, घरातही मार्कांच्या स्पर्धेपुढे मुलांमध्ये मनात कोणकोणते विचार आहेत याची पालकांना फिकीर नाही, असा काळ. अशा वातावरणात एक आशेचा किरण घेऊन मूल्यवर्धन कार्यक्रम आला. आमच्या परीने आम्ही शाळेतच मुलांना विविध गोष्टी, प्रसंगातून घडविण्याचा प्रयत्न करत होतोच, पण मूल्यवर्धनने त्यामध्ये शिस्त आणि उद्दिष्टे आणली आणि या सर्व प्रयत्नांना निश्चित दिशा मिळाली. हा कार्यक्रम एका सुंदर चौकटी मध्ये बांधून समोर आला आहे आणि तोही अतिशय रंजक आणि सूत्रबद्ध पद्धतीने.

मूल्यवर्धन कार्यक्रमात वेगळेपण काय? असा प्रश्न अनेक शिक्षकांनी मला प्रशिक्षणादरम्यान विचारला. या कार्यक्रमात मी शिकले की, मुलांना शिकवायचे नाही, तर शिकू दयायचे. गोष्ट सांगितली की तिचे तात्पर्य सांगायचे नाही तर त्यांना त्यांचा विचार करू दयायचा. मग त्यांचे त्यांनाच उमगत जाते, की काय चूक आणि काय बरोबर? तात्पर्य सांगून त्यांच्या विचारप्रक्रियेमधे समोर आपण बाधा निर्माण करीत असतो. त्याच गोष्टीवर विचारप्रवर्तक असे प्रश्न विचारले तर मात्र निरनिराळया आयामांनी मुले त्यावर विचार करतात. येणाऱ्या उत्तरामध्ये इतकी विविधता येते की, आपणही त्या बाजूने कधी विचार केलेला नसतो. इ. तिसरी मध्ये “तुम्ही काय कराल?” नावाचा उपक्रम आहे. सहलीला गेलेली मुले एकटी डोंगरावर राहातात. शिक्षक आजारी विदयार्थ्याला घेऊन उपचारासाठी जातात असा प्रसंग आहे. “अशा वेळी तुम्ही काय कराल?” असा प्रश्न विचारला होता ज्याची खूप अफलातून उत्तरे आली. अगदी चित्रात दाखविल्याप्रमाणे शिक्षक मुलाला घेऊन जातात, असे होते. तर मुलाला एका शिक्षकाने नेण्याचे आणि एकाने इतर मुलाजवळ थांबायला पाहिजे होते, इथपर्यत चर्चा झाली. मोबाईल वर फोन करू/काही जण शिक्षकांकडे जातील/काही थांबतील/काही हाका मारतील, अशा अनेक पर्यायांवर मुलांनी विचार केला. विचारांची ही प्रक्रिया मग पाठातील सर्व घटकांना लागू पडू लागली. मराठी भाषा विषयाचे पाठ शिकविताना देखील ही मात्रा लागू पडली. विचारप्रवर्तक प्रश्नांची संख्या वाढू लागली. मूल्यवर्धनच्या विदयार्थी उपक्रम पुस्तिका, शिक्षक उपक्रम पुस्तिका या अतिशय उपयुक्त स्त्रोत ठरल्या. त्यातील प्रत्येक ओळ ही शिक्षकांना मार्गदर्शक ठरते. टप्याटप्याने पाठाची रंगत वाढते आणि कोणतीही पायरी निसटली जात नाही.

माझ्या शाळेतील मुलांमध्ये मूल्यवर्धन मुळे एकंदरीत दिसून आलेले बदल :-

मुलांमध्ये वर्गनियम तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यामुळे स्वयंशिस्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. दुसऱ्याच्या त्रासाची जाणीव होऊन मुलांच्या वर्तणुकीत बदल येऊन सहानुभूति निर्माण झाली आहे. मूल्यवर्धन खोटे बोलू नका, ढकलू नका, असे सांगत नाही तर खोटे बोलल्याने काय परिणाम होतात, जर मला कुणी चिडवले, ढकलले, माझ्याशी खोटे बोलले तर मला काय वाटेल याची जाणीव करून देते.

आपल्या आईवडिलांच्या कामाची यादी पाहिली आणि आपली यादी पाहिली की आपोआप आईला मदत करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. आरोग्याच्या चांगल्या सवयी रुजण्यासही मदत झाली आहे. मुले स्वतः आपले वेळापत्रक बनवून त्याचे पालन करत आहेत.

शिक्षकांना निरनिराळे खेळ सुचवून मुलांमध्ये आवड निर्माण करण्यात आली. एकंदरीत मुथ्था फाउंडेशनचा हा उपक्रम मुलांच्या भावनिक विकासासाठी मार्गदर्शक ठरत आहे. गुणवत्ता विकासासाठी आम्ही सर्व शिक्षक कायमच कटिबध्द आहोत. पण गुणवत्तेला भावनिक विकासाची जोड नसेल तर शिक्षणाचा आत्मा हरवल्यासारखा वाटतो.

आपल्याला एक जबाबदार नागरिक घडवायचा आहे याची जाणीव जागी होत राहते ती यासारख्या उपक्रमातून... अतिशय उपयुक्त आणि गरजेचा हा उपक्रम सदोदित आपल्या शाळांमधून राबविला जावा आणि आधिकाधिक मुलांपर्यत पोहचावा हीच सदिच्छा...!

## माझी मूल्यवर्धित शाळा

**श्री. विजय तानाजी चिलबुल,**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भागेबोरी, ता.भिवापूर, जि. नागपूर.



गेली अनेक वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्य करीत असलो तरी शाळेतील मुलांमध्ये शिस्त कशी येईल? राज्यघटनेतील मूल्ये कशी रुजवावी? त्यांना अभ्यासासाठी कसे प्रवृत्त करावे? शाळेविषयी आवड कशी निर्माण करावी? शाळेतील ताणतणाव कसा दूर करता येईल? असे प्रश्न मला नेहमी पडायचे याची उत्तरे मिळाली ती मूल्यवर्धनमुळे.

जि. प. नागपूरने 'मूल्यवर्धन' कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. याआधीही मूल्यशिक्षण होते पण त्याचा पाहिजे तसा फायदा झालेला किंवा तो परिणामकारक ठरलेला नाही. विद्यार्थी उपक्रमपुस्तिकेमध्ये राज्यघटनेतील मूल्ये मुलांमध्ये रुजावीत यासाठी गोष्टीरूपातून मूल्ये रुजविण्याचा छान प्रयत्न केलेला आहे. शिक्षक मार्गदर्शक पुस्तिकेमध्ये अनेक उपक्रम दिलेले आहेत. त्या उपक्रमातून आजचा शालेय विद्यार्थी भविष्यात लोकशाहीचा जबाबदार, संवेदनशील व कर्तबगार नागरिक बनेल यात शंका नाही. इयत्ता १ ते ४ साठी स्वतंत्र उपक्रमपुस्तिका दिलेली असून त्या त्या वर्गानुसार विद्यार्थी उपक्रम करू शकतात व हे करीत असताना मुलांना संविधानातील मूल्ये व त्यासंबंधित कौशल्ये विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध होताना दिसून येतात.

शालेय शिक्षण ज्ञानरचनावादावर आधारित, बालस्नेही, आनंददायी तसेच विद्यार्थीकेंद्रित होण्यासाठी मूल्यवर्धन अधिक प्रभावीपणे उपयोगी पडते.

'वर्गनियम' या उपक्रमातून विद्यार्थ्यांनीच वर्गनियम तयार केले. वर्गात शांतता ठेवा. वर्गात कचरा करू नका. कचरा कचराकुंडीत टाका. चप्पल/जोडे रांगेत ठेवा. नियमित अभ्यास करा. मुलांनी नियम केल्यामुळे मुलांची स्वतः विषयीची जाणीव समृद्ध झाली आहे. मुले स्वतंत्र विचार करू लागली आहेत. जबाबदारीने वागू लागली आहेत. जोडी चर्चा, सहयोगी अध्ययन, सहयोगी खेळ, गटचर्चा इत्यादी उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या विचारांना वाव देता येतो .राज्यघटनेतील मूल्यांची रुजवण विद्यार्थ्यांमध्ये होण्यासाठी विविध उपक्रम सांगितले गेले आणि तेव्हा कळले की मूल्ये ही शिकवली जात नाही तर ती रुजवावी लागतात. यातूनच मला एक मार्ग सापडला तो म्हणजे मूल्यवर्धन उपक्रमाचा आणि माझी शाळा मूल्यवर्धित झाली.



## मूल्यवर्धन यशोगाथा

### मूल्यवर्धनचा परिणाम, तीन वर्षांपूर्वी मुले होती नगण्य.... आता प्रवेशासाठी मोठी रांग...!!

जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या सातत्याने कमी होत चालली आहे. त्यामुळे काही सरकारी शाळा बंद होत आहेत. अशा काळात सांगलीपासून अंदाजे ४० किलोमीटर अंतरावर वाळवा तालुक्यात एक शाळा आहे. जिथे गेल्या तीन वर्षात विद्यार्थ्यांची संख्या तीनपटीने वाढून शंभरच्या पुढे गेली आहे. यावर्षी एप्रिलच्या वीस दिवस अगोदरच इयत्ता पहिलीमध्ये ४० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. परंतु खरी गोष्ट अशी ही आहे की, ही शाळा तीन वर्षांपूर्वी कमी विद्यार्थी संख्येच्या अडचणीचा सामना करीत होती. मात्र आता ही संख्या शंभरच्या पुढे गेली आहे. आणि येत्या शैक्षणिक वर्षात ही संख्या १५०च्या वर जाणार आहे. तसें बघितले तर १०००० लोकसंख्येच्या या गावात ६ सरकारी आणि १ खाजगी शाळा आहेत. परंतु बदललेल्या वातावरणामुळे गावातील प्रत्येक कुटुंब आपली मुले याच सरकारी शाळेत घालण्यासाठी उत्सुक आहेत. हे सारं घडलं ते दोन शिक्षकांमुळे. मात्र शिक्षकांचे मत आहे की, जर मूल्यवर्धन नसते तर हा बदल घडलाच नसता..!

**मूल्यवर्धनमुळे झाले परिवर्तन :**
श्री. गिरीश मोकाशी सांगतात की, मराठी माध्यमाच्या या शाळेची स्थापना सन १८८० मध्ये झाली आहे. तीन वर्षांपूर्वी ही शाळा बंद होण्याच्या मार्गावर होती. शाळा बंद होणार..! अशा शीर्षकाच्या बातम्या सुध्दा दैनिक वर्तमानपत्रांमधून प्रसिध्द झाल्या होत्या. या शाळेत गावातल्या पाच पिढया घडल्या आहेत. त्यामुळे शाळेशी लोकांचे भावनिक नाते तयार झाले आहे. परंतु आता सारेच वातावरण बदलले आहे. म्हणून आजची परिस्थिती एकदम वेगळीच आहे. दुसरे शिक्षक श्री. कृष्णा पाटील सांगतात की, येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी संख्या १५० च्या वर जाईल. आम्ही मुलांना शालेय अभ्यासक्रम शिकविण्याबरोबरच आनंदी आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यामुळे मुलांमध्ये शाळा व शिक्षणाची गोडी निर्माण झाली आहे. त्यातूनच शाळेत आता विद्यार्थी मिळून–मिसळून शिक्षण घेत आहेत. त्यांच्यात एकी, आपुलकी आणि सांघिक भावना वाढली आहे. ते पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात संस्कारी झाले आहेत. त्याचप्रमाणे ते चांगले मार्क सुध्दा मिळवत आहेत. त्यांच्या मनातला संकोच दूर होवून आत्मविश्वास वाढीस लागला आहे आणि हे सगळें मूल्यवर्धनमुळेच शक्य झाले आहे.

**मूल्यवर्धन विषयीचे अनुभव :**
श्री. मोकाशी म्हणाले की, डिसेंबर २०१५ मधे पुण्यात संपन्न झालेल्या राज्यस्तरीय मूल्यवर्धन कार्यशाळेत मी सहभागी झालो होतो. त्यानंतर संपूर्ण सांगली जिल्हयातील केवळ याच शाळेत मूल्यवर्धन उपक्रमसुरु करण्यात आला. म्हणजेच मूल्यवर्धन अमंलबजावणीसाठी जिल्हयातली ही पहिली शाळा आहे. मूल्यवर्धनचे उपक्रम खूपच प्रभावी व आनंददायी आहेत. यामुळे आम्ही मुलांना शिकवण्याच्या पध्दतीत बदल केला आहे. या कारणांमुळेच शाळेविषयी विद्यार्थी आणि पालक यांचा दृष्टिकोन सकारात्मक झाला आहे.

श्री. कृष्णा सांगतात की, या प्रकारचे उपक्रम शिकल्याने मुलांमध्ये सृजनशील आणि स्वतंत्र विचारपध्दत वृध्दिंगत होत आहे. मुलांचा आपल्या पालकांशी संवाद किंवा संबंध वाढावा यासाठी मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये काही गृहपाठ दिलेले आहेत. त्यामध्ये मुले आपल्या पालकांशी वेगवेगळ्या विषयांवर संवाद साधतात, प्रश्न विचारतात, माहिती घेतात, अशा प्रकारे पालकांनासुध्दा उपक्रमात सहभागी करून घेतले जाते.

**मुलांचे अनुभव :**
इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या तनवीर मोहम्मदने सांगितले की, मूल्यवर्धन मधील गोष्टी आम्हाला खूप आवडतात. कारण त्यामध्ये सगळयांना विचार करावा लागतो. सगळे विद्यार्थी अनेक प्रकारांनी एकाच प्रश्नाला उत्तरे देतात. आमच्या वर्गातील मुलांनी गैरसमज या गोष्टीवर एक नाटक तयार केले आहे.

**पालकांचे अनुभव :**
गावातील पालकांपैकी श्री. प्रमोद यांनी सांगितलें की, शाळेची इमारत आणि मुलांना पाहून आपण बदललेल्या परिस्थितीचा किंवा वातावरणाचा अंदाज लावू शकत नाही. तो बदल ती व्यक्तिच समजू शकते, जी गेल्या तीन–चार वर्षांपासून शाळेशी जोडली गेली आहे. माझी स्वत:ची मुलगी एक वर्षापूर्वी खाजगी शाळेत शिकत होती. पण आता ती याच सरकारी शाळेत शिकत आहे आणि तिच्या गुणवत्ता आणि वर्तनात खूपच बदल झाला आहे.

**आजोबांचा आपल्या नातवांशी सुसंवाद :**
जेष्ठ नागरिक समन्वय समितीचे सदस्य असणारे श्री. जगन्नाथ मोरे यांनी सांगितले की, मला मूल्यवर्धन विषयी माहिती आहे. या उपक्रमामुळे शैक्षणिक वातावरणात सकारात्मक बदल झाला आहे. शाळेतील शिक्षकांनी आम्हा जेष्ठ नागरिकांचा मुलांशी संवाद घडवून आणला. शाळेत होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांत आम्हाला बोलावून मुलांना बोलायला सांगितले जाते. चर्चेत व्यसनमुक्ति व स्वच्छता सारखे महत्त्वाचे विषय असतात.

## मूल्यवर्धन शिक्षकांसाठी

### शिक्षक बंधू भगिनींनो, खाली दिलेल्या कविता तुम्ही मूल्यवर्धनच्या उपक्रमात समाविष्ट करून पहा :

#### अक्षर



ताई, तुझं अक्षर
मुंग्यांची रांग
चष्म्यातून पाहुन तरी
दिसतंय का सांग !
भाऊची वही,
कुत्र्या–मांजराचे पाय
डोक्यावरच्या रेघा
कुठे हरवल्या काय?
रांगोळीचे थेंब, तसं
आई लिहिते पत्र
कित्ति कित्ति छान!
आम्ही म्हणायचं मात्र
बाबांचं अक्षर
हलव्याचा दाणा

आई म्हणत असते–खरं
वाटेना कोणा!
गालावरची तीट तशी
मी लिहिते कोरुन
वाचायचं सोडून, सारे
हसतात का चोरुन?

कृ ब निकुंब

#### अडम् तडम्

अडम् तडम्,
स्टुलावर चढम्;
सांभाळून चढम्
नाहीतर पडम्
धडम् धडम् !!
अब्बा अब्बा,
फळीवर डब्बा;
नक्की नक्की,
गोष्ट पक्की !



आडू पाडू
डब्यात लाडू !
डब्यावर हल्ला
डल्ला डल्ला !
खिशात लाडू
भरुन घेवम्,
जिथल्या तिथे

डबा ठेवम्,
डबा झाकम्,
पाय हळूच
खाली टाकम् !
अडम् तडम्,
सांभाळून उतरम्;

गुपचूप गुपचूप
बाहेर पडम् !
अडम् तडम्,
अडम् तडम् !

मंगेश पाडगांवकर

## मूल्यवर्धन ने बदल दिया परिवर्तन को देखने का दृष्टिकोण

**श्री. शिरीष खरे,**
आशय लेखक आणि समन्वयक, आशय विकसन विभाग



मूल्यवर्धन को अब तक मैंने सामग्री लेखन और प्रशिक्षण कार्यशालाओं से समझा। लेकिन, बीते दिनों मैंने इसके असर को समझने के लिए कुछ स्कूलों का अवलोकन किया। सांगली, कोल्हापूर और रत्नागिरी के इन स्कूलों से लौटने के बाद मैंने पाया कि मेरी धारणाएं टूटी हुई हैं। मैंने पाया कि मेरे भी भीतर परिवर्तन को देखने की एक नई सोच है।

उदाहरणों से समझें तो सांगली से १५० किलोमीटर दूर जत तहसील में बाबरवस्ती स्कूल है, पुणे में अपने कार्यालय से जब मैंने सुना कि मूल्यवर्धन के प्रभाव से पूरी बस्ती नशा–मुक्त हो गई तो मुझे यह बात बढ़ा–चढ़ाकर बताई गई लगी। मैंने सोचा कि बड़ों को तो नशे के नुकसान पता ही हैं, इसके बावजूद वे तरह–तरह के नशे करते हैं, ऐसे में बच्चों के कहने भर से वे अपनी आदत कैसे छोड़ सकते हैं! लेकिन, जब मैं यहां पहुंचा और शिक्षक, बच्चों, पालकों, ग्रामीणों और सरपंच से बात की तो जाना कि मैंने पुणे में क्या मिस कर दिया था। असल में मैंने बच्चों के प्रेम और विश्वास, उनकी जिद और कोमल भावनाओं की ताकत को न समझने की चूक कर दी थी। एक बुर्जुग ने मुझे बताया कि उन्होंने कभी अपने किसी घर वाले की नहीं मानी, लेकिन वह नाती के प्यार और हठ के आगे अब झुक गये और इस उम्र में तंबाकू और शराब की लत से दूर हो गये।

दूसरा, जब मैं परिवर्तन की बात सोचता तो मेरी आंखें कोई बड़ा परिवर्तन देखना चाहती थीं। इस दौरान मैंने किसी भी तरह के परिवर्तन को दूसरों की आंखों से देखने के बारे में सोचा ही नहीं था। रत्नागिरी जिले के कुंभारवाडी स्कूल ने मेरी इस धारणा को तोड़ा। यहां पिछले दो साल में मूल्यवर्धन के कारण सभी बच्चों में परिवर्तन आ रहा है। हो सकता है यह सामान्य बात हो, मगर इसी में एक और कहानी छिपी थी, जिसमें एक बच्चा है, यह बाकी बच्चों के साथ अक्सर जमकर मारपीट करता रहता था, इस बच्चे में किसी तरह के बदलाव की उम्मीद शिक्षिका ने छोड़ दी थी। लेकिन, अब यही बच्चा मूल्यवर्धन की कई तरह की गतिविधियों में शामिल होने के बाद आज स्कूल का आदर्श विद्याथी है। पहली नजर में यह परिर्व की कोई बड़ी कहानी लगती ही नहीं है, लेकिन शिक्षिका की आंखों से इतना बड़ा परिवर्तन होते हुए उसने कभी नहीं देखा। उसका कहना है कि यदि ऐसे बच्चे बदल सकते हैं तो इसका मतलब है मूल्यवर्धन बहुत असरदार है।



## शिक्षकापासून प्रशिक्षकापर्यंतचा प्रवास

**श्री. विजय धनवे,**
प्रशिक्षक व जिल्हासमन्वयक नाशिक



मूल्य या शब्दाचा अर्थ तसा व्यापक आहे. शिक्षणात मूल्य असायला हवं, अशी माफक अपेक्षा नेहमी समाज आणि सरकार नावाची यंत्रणा करीत असते. कोणत्याही व्यक्तीला मोठे होण्यासाठी त्याची मूल्यात्मक जडण–घडण होणेही आवश्यक असते. माझा आणि मूल्य या शब्दाचा संबंध बालवयात अ ब क ड पाटीवर गिरवतानाच आला. एकीकडे शिक्षण घेत असतानाच आमच्यात मूल्य रूजाविण्याचा त्यावेळचे सर्व गुरूजी प्रामाणिक प्रयत्न करायचे. आम्हीही उरलेल्या किंवा शिल्लकच्या तासाला मूल्यशिक्षणाचे धडे गिरवले. जशी इयत्ता वाढत गेली तशी मूल्ये समजायला लागली. परंतु शाळेत वर्गाच्या भिंतीवर लावलेल्या दहा मूल्यांचा संबंध केवळ त्या तासापुरताचं मर्यादित राहत होता. कोणत्याही अधिकारी, शिक्षक व इतर मान्यवरांनी विचारलं तर दहाच्या दहा मूल्ये अगदी तोंडपाठचं.....!! मात्र शाळेतली मूल्ये शाळेत विसरून पुन्हा आपली दुनियादारी सुरू व्हायची. गप्पा, गोंधळ, धिंगाणा, खेळ, खोडया, मस्ती, मज्ञा अशा गोष्टीत मूल्यशिक्षणाचा तास सरांच्या कडक स्वभावापुरता मर्यादित राहिला...!!

असाच प्रवास पूर्ण करता करता शिक्षक बनलो. इथं मात्र मूल्यशिक्षण काही पाठ सोडायला तयार नव्हतं. शिक्षणात मूल्यांचे महत्त्व काय? मूल्यशिक्षण आणि शिक्षणाचा संबंध? मूल्यशिक्षणाची गरज? मूल्यशिक्षणाचे आजचे चित्र... अशा अनेक विषयांवर स्वाध्याय व पोस्टर्स तयार करणे अनिवार्य होते. सतत डोक्यात मूल्यशिक्षणच असायचे. महाविद्यालय सुटल्यानंतर बस स्थानक आणि बसने घरी जात असताना लोकांचा व्यवहार बघून मूल्यशिक्षण ठरवू लागलो. गावात, पारावर, घरात, कार्यक्रमात मूल्याधिष्ठित व्यवहार तपासू लागलो. मूल्यांची महती समजू लागली. पाठाचे सर म्हणून गाव–खेडयात गेल्यावर मुलांना मूल्यशिक्षणाचे धडे देऊ लागलो. पण २०१२ साल मात्र वेगळे ठरले. पुण्याच्या शांतिलाल मुथ्था फाऊंडेशनच्या मूल्यवर्धन प्रकल्पाची जाहिरात वर्तमानपत्रात आली आणि मूल्यवर्धन या आगळ्या–वेगळ्या प्रकल्पात गाईड म्हणून पदभार देण्यात आला. मी गाईड म्हणून बीड जिल्हयातील आष्टी तालुक्यात असणाऱ्या बीडसांगवी या छोटयाशा गावात रूजू झालो. त्यामध्ये मला प्रत्यक्ष मुलांसोबत वेगवेगळया प्रकारे अनेक गोष्टी शिकता व शिकविता आल्या. या कामात समाधान आणि आनंद दोन्ही मिळत होते. आपण काही तरी वेगळे करीत असल्याची भावना निर्माण झाली होती. मूल्यवर्धनचे शिक्षक म्हणून नावलौकिकही होऊ लागला होता. पण २०१४ मात्र देशात जसे बदल होत गेले अगदी तसेच बदल माझ्या वैयक्तिक आयुष्यातही होत गेले. शाळेवर मुलांसोबत काम करणाऱ्या आम्हा सर्वचं गाईड लोकांना मुख्य कार्यालयाकडून बोलावणे आले. त्यानुसार आम्ही तिथे हजर झालो. कामाच्या आणि निरीक्षणाच्या आधारे आमच्यापैकी २० लोकांना पुढे निवडण्यात आलं. त्यामध्ये माझा सहभाग होता. या धावपळीत गाईड हे नाव मागे पडून मास्टर ट्रेनर (एम.टी.) हे नाव मिळालं...!!

इथं एक नवी इनिंग सुरू झाली होती. एम.टी. या शब्दाचा अर्थही तेव्हा माहीत नव्हता तर एम.टी. म्हणजे मुख्य प्रशिक्षक होय. आता इथले काम फारचं धावपळीचे, व्यापक आणि जिकिरीचे होते. सतत प्रवास, प्रशिक्षणे, बैठकांनी व्यापून गेलो. इथं मात्र थेट शिक्षक, अधिकारी, केंद्रप्रमुख आणि मोठया हुद्दयावरील लोकांचा संपर्क येत राहिला. मूल्यवर्धनमुळे ज्ञानात, स्वभावात, वागण्यात, बोलण्यात, व्यवहारात बदल होत गेले. स्वत:मधले अवगुण कमी करण्यास मदत झाली. आत्मविश्वास वाढला. भाषिक कौशल्ये वाढली. संवादाची कला सापडली. निर्णय क्षमता विकसित झाली. एकमेकांना सन्मान दयायला शिकलो. एकूणच काय तर मूल्यवर्धनमुळे स्वत:च्या व्यक्तिमत्वावर सकारात्मक परिणाम झाला.

मी कितीतरी प्रशिक्षणे पूर्ण केली. प्रत्येक वेळी नवीन काही शिकता आले. अनेक जिवाभावाची माणसे पहायला मिळाली. ध्येयासाठी झटणारे सरकारी हात पहायला मिळाले. आपण काहीतरी नवीन केलं पाहिजे, अशी भावना बाळगणारे अधिकारी भेटले. हे आपल्यासाठीचं आहे असं ठणकावून सहकाऱ्यांना सांगणाऱ्या आधुनिक दूर्गा दिसल्या. वयाची पन्नाशी पार केलेले नवे तरूण–तरूणी बघितले. खेळात रमणारे बालसंवगडी दिसले. असे बरेच काही या प्रवासात मिळाले आहे.

## प्रथम संस्थेमार्फत मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा



पुण्यातील हवेली तालुक्यामध्ये सुरू असलेला मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्याच्या हेतूने ''प्रथम'' या संस्थेच्या वतीने २९ मार्च २०१९ रोजी आढावा दौरा करण्यात आला. या दौऱ्याचे मुख्य कारण शालेय स्तरावर मूल्यवर्धन कार्यक्रमाची कार्यपद्धती व अंमलबजावणी समजून घेणे तसेच शैक्षणिक अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी संवाद साधून मूल्यवर्धनचा आढावा घेणे. सदर आढावा बैठकीसाठी श्रीमती नंदिता बॅनर्जी (ASER सेंटर, प्रथम, भारत समन्वयक, मा.श्री. भरमण्णा शेरीकर (प्रथम, महाराष्ट्र समन्वयक), मा.श्री. लक्ष्मी नारायणन (मूल्यवर्धन प्रोजेक्ट मॅनेजर) हे उपस्थित होते.

## सातारा तालुक्यातील प्रेरकांचा सन्मान सोहळा



शांतिलाल मुथ्था फाऊंडेशन व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) यांच्या संयुक्त विद्यमाने राबवीत असलेल्या मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रेरक सन्मान सोहळा २९ मार्च २०१९ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह, पंचायत समिती, सातारा येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाला मा. गटविकास अधिकारी श्रीमती गावडे मॅडम, मा. गटशिक्षणाधिकारी श्री. संजय धुमाळ, विस्तार अधिकारी सौ. गुरव मॅडम आणि सौ. शिंगाडे मॅडम, सर्व केंद्रप्रमुख, प्रेरक शिक्षक, विषय साधन व्यक्ती, मूल्यवर्धन तालुका समन्वयक उपस्थित होते. अतिशय उत्साहात हा सन्मान सोहळा पार पडला. प्रास्ताविक सौ. प्रतिभा चौगुले मॅडम यांनी केले. तर मनोगत गटशिक्षणाधिकारी श्री. संजय धुमाळ साहेब यांनी केले. त्यात ते म्हणाले की, आजच्या काळात नवीन पिढी आपल्या संस्कृतीपासून दूर जाऊ नये व त्यांना 'स्व' ची जाणीव असावी याकरिता विद्यार्थी जीवनातच नैतिक मूल्ये रुजवून त्याची वाढ व्हावी या उद्देशाने प्राथमिक स्तरावर मूल्यवर्धन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. शिवाय हा कार्यक्रम काळाची गरज सुद्धा आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व केंद्रप्रमुख व प्रेरक शिक्षक यांना सन्मानपत्र व पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.

## मूल्यवर्धन पुस्तिका वितरण

संपूर्ण महाराष्ट्रातील एकूण ४०८ तालुक्यातील मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी अशा चार माध्यमांच्या परिषदेच्या सर्व शाळांमध्ये मूल्यवर्धनची अंमलबजावणी होत असून त्यासाठी




शासनाच्या मदतीने शिक्षक आणि विद्यार्थी उपक्रम पुस्तिका सर्व शाळांतील शिक्षक आणि मुलांना पुरविल्या जातात. मागच्या वर्षी ही पुस्तके उशिरा मिळाल्याने मूल्यवर्धन उपक्रमांची सुरुवात थोडी उशिरा झाली. हे लक्षात घेऊन शासनाने यावर्षीच्या सर्व उपक्रम पुस्तिका मार्च २०१९ अखेरीस छापून पूर्ण केल्या आहेत आणि सध्या या पुस्तिका प्रत्येक तालुक्यात पोहचविण्याचे काम युद्ध पातळीवर चालू आहे. या महिना अखेरीस हे वितरण पूर्ण होऊन येणाऱ्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीसच मुलांच्या हातात त्या पहावयास मिळतील, जेणेकरून मूल्यवर्धनची प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य होईल.

## हिंदी आढावा बैठक वृत्तांत



महाराष्ट्रात मराठी माध्यमांच्या जि. प. प्रा. शाळांमध्ये मूल्यवर्धन यशस्वीपणे राबविल्यानंतर विद्या प्राधिकरणाने हिंदी माध्यमांच्या सरकारी शाळांमध्ये मूल्यवर्धन घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम या वर्षी प्रायोगिक तत्वावर मुंबई, ठाणे, नागपूर आणि गोंदिया या चार जिल्ह्यांत राबविण्यात आला. यासाठी या चार जिल्ह्यातील निवडक कृतिशील, उत्साही अशा १३७ शिक्षक प्रेरकांची निवड करण्यात आली. या शिक्षकांना चार दिवसीय मूल्यवर्धन प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणानंतर त्यांनी मूल्यवर्धन उपक्रम आपापल्या वर्गात घेण्यास सुरुवात केली. या कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी चारही जिल्ह्यात आढावा बैठका घेण्यात आल्या या बैठकांना त्या त्या जिल्ह्याच्या DIECPD चे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीमध्ये जिल्ह्यात राबिवल्या जाणाऱ्या हिंदी मूल्यवर्धन कार्यक्रमाची सद्यस्थिती तसेच प्रेरकांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे मूल्यवर्धन संदर्भातील अनुभव यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या आढावा बैठकीमधून प्रेरकांना मूल्यवर्धन संकल्पना अधिक स्पष्ट होण्यास मदत झाली.

## झारखंड SCERT प्रतिनिधींचा मूल्यवर्धन आढावा दौरा



या आढावा दौऱ्याचा मुख्य हेतू म्हणजे मूल्यवर्धन कार्यक्रमाचा विस्तार झारखंड राज्यात होणार असल्याने त्याची महाराष्ट्रातील सद्यस्थिती समजून घेणे. या अनुषंगाने दिनांक ८ एप्रिल २०१९ रोजी झारखंड SCERT प्रतिनिधींचा शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या प्रतिनिधींसोबत कोल्हापूरमधील महानगरपालिकेच्या दोन शाळांना भेटी देऊन मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीसाठी वरील मान्यवरांव्यतिरिक्त कोल्हापूर DIECPD चे प्राचार्य श्री. शेख सर तर त्यांचे काही सहकारी शिवाय मुख्याध्यापक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. बैठकीत प्रामुख्याने मूल्यवर्धन कार्यक्रमाची गरज, अंमलबजावणी करण्याची पद्धत, प्रशिक्षणाचे स्वरूप, शिक्षकांना मिळणारे साहित्य, मुलांसाठीचे साहित्य, शिक्षकांना उपक्रम घेत असतांना आलेले अनुभव व अडचणी, मुलांमध्ये दिसून आलेले सकारात्मक बदल यांवर चर्चा केली गेली.



## मूल्यवर्धन : पुढची दिशा

आतापर्यंत राज्याच्या निम्म्या तालुक्यांतील शाळांत या कार्यक्रमामुळे संविधानातील मूल्ये बालस्नेही आणि कृतीशील रीतीने पोहोचत आहेत ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. उर्वरित सर्व तालुक्यांतील शाळांमध्ये येत्या दोन महिन्यात मूल्यवर्धन कार्यक्रम पोहचेलच. एससीइआरटी आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशन एकत्रितपणे शाळा/वर्गभेटी करून कार्यक्रमाचा सातत्याने मागोवा घेत आहेत.

मूल्यवर्धन उपक्रमामुळे प्राथमिक शाळा सचेतन झाल्याचे जाणवते आहे. विद्यार्थी आपले मत आत्मविश्वासाने आणि सृजनशील विचार करून मांडत आहेत. शाळेविषयीच्या तसेच वैयक्तिक जबाबदाऱ्या समजू लागले आहेत. आपले छंद, गुण, कौशल्ये,क्षमता ओळखू लागली आहेत. गप्प बसणारी बुजरी मुले बोलकी होत आहेत. शिवाय एकमेकांना मदत करण्याची भावनाही वाढीस लागली आहे. यात प्रमाणभाषेचा आग्रह नसल्यामुळे मुले आपल्या बोलीभाषेतून आपले अनुभव सहज मांडण्याचा प्रयत्न करत आहेत. एकंदरीत शाळेचे वातावरण सचेतन होताना दिसत आहे.

शिक्षकमित्रांनो, हे सर्व बदल शाळेमध्ये आनंद निर्माण करणारे आणि शिक्षकांची उमेद वाढविणारे आहेत. मात्र एवढ्यावरच समाधान न मानता यावर्षी आपल्याला पुढचे पाऊल उचलता येईल. दिलेले उपक्रम आपण अधिकाधिक चांगल्या रीतीने घेणार आहोतच त्याचबरोबर कोणत्याही विषयाचा घटक शिकविताना एखादा मूल्यवर्धन उपक्रम त्यामध्ये जोडून घेता येतो का हेही पाहता येईल. त्याचप्रमाणे विविध शालेय विषयातील घटकातून रुजविता येणारी मूल्ये हेरून तीबालस्नेही पद्धतीने रुजविण्याचे पाठ नियोजन करता येईल. दुसरे म्हणजे मूल्यवर्धन मधील जोडी चर्चा, गटचर्चा, इत्यादी सहयोगी अध्यापनाच्या पद्धती इतरही विषय शिकविताना वापरता येतील. त्यामुळे मुले ते विषयही अधिक आनंदाने, मुक्तपणे आणि चागंल्या रीतीने शिकतील. काही शिक्षकांनी यापूर्वीच या दिशेने पाऊल उचलल्याचे शाळाभेटीतून निर्दशनास येत आहे.

मूल्यवर्धन कार्यक्रमातील सर्व सकारात्मक बाबींची गुंफण वर्गातील दैनंदिन अध्यापनात आणि सहशालेय उपक्रमातही सहजपणे करण्याचे पुढचे पाऊल आपल्याला उचलायचे आहे ते यशस्वीपणे उचलण्यासाठी सर्व शिक्षक आणि अधिकारी बांधवांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**डॉ. दत्तात्रय मेंढेकर,**
**उपविभाग प्रमुख, अभ्यासक्रम विकसन विभाग,**
**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे**



## मूल्यवर्धनातून बालक समृद्धी...

'मूल्यवर्धन' या नावातच खूप काही दडलेले आहे. मूल्यवर्धन कार्यक्रम हा महाराष्ट्र शासनाचा मूल्यशिक्षणामधील पहिला सर्वंकष व निरंतर चालू असणारा महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाच्या सुरुवातीपासून प्रगतीचा आलेख बघणारा मी साक्षीदार.

मूल्याधारित शिक्षण आत्मसात करण्याची सहज, सोपी पद्धत म्हणजे 'मूल्यवर्धन कार्यक्रम' होय. या सहजसोप्या पद्धतीमुळेच हा कार्यक्रम विद्यार्थी व शिक्षक यांच्यापर्यंत कमी वेळेत पोहोचला. विद्यार्थी हा वर्गापुरता, शाळेपुरता न राहता सुजाण नागरिक म्हणून समाजामध्ये सहजपणे वावरत आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या यशाचे गमक हे अध्ययन साहित्य, प्रशिक्षणाच्या आनंददायी व कृतियुक्त प्रक्रियेमध्ये दडलेले आहे. शिक्षक प्रशिक्षणामधील शिक्षकांचा कृतियुक्त सहभाग हा त्यांच्या अनुभवविश्वाची समृद्धी वाढवणारा व आत्मिक उर्जा देणारा ठरतो आहे. या सर्व बाबींचा परिणाम शिक्षक विद्यार्थी यांच्या आंतरक्रिया अधिक सजग व आनंददायी होण्याकरिता होतो आहे व यामधून अध्ययन निष्पत्ती सहज व प्रभावी स्वरूपात होत आहे. कोल्हापूर, सांगली, सोलापूर, लातूर, हिंगोली, चंद्रपूर या जिल्ह्यात वर्गनिरीक्षणादरम्यान माझ्या असे लक्षात आले कि, या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व निर्भीडपणा वाढला आहे. आपल्या समोर असलेल्या अधिकारीवर्गाला विद्यार्थी बिनधास्त उत्तरे देतात.

मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता जिल्ह्यामधून DIECPD प्राचार्य, शिक्षणाधिकारी, वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, गटशिक्षणाधिकारी, विषयतज्ञ, केंद्रप्रमुख तसेच जिल्हा व तालुका समन्वयक (शांतिलाल मुथ्था फाउंडेशन) यांचा चांगला मिलाप होऊन, एक सुसूत्र सहकार्य–साखळी निर्माण झाली आहे या सर्व यंत्रणेची मदत शिक्षकांना होत आहे. वर्ग निरीक्षण व मूल्यांकन करण्यासाठी MV-App आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमाबाबत नाविन्यपूर्ण व उत्साहवर्धक बाब म्हणजे उर्दू माध्यमाचे शिक्षक स्वतःहून मागणी करून उर्दू शाळेत आनंददायी पद्धतीने हा कार्यक्रम पुढाकार घेऊन राबवत आहेत. उर्दू, मराठी, इंग्रजी, हिंदी या चार भाषेत मूल्यवर्धन अध्ययन सामग्री तयार केली आहे त्यामुळे मुलांना हा कार्यक्रम आपला वाटतो. मुलांमधील सकारात्मक बदलाबाबत पालकांचे मिळत असलेले भरभरून अभिप्राय हीच मूल्यवर्धन कार्यक्रमाची यशस्विता होय.

**डॉ. इरफान इनामदार,**
**वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (DIECPD), सोलापूर**





[illegible] :
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, ८ वा मजला, मुथ्था चेंबर्स –२, सेनापती बापट मार्ग, पुणे–४११०१६.
**फोन नं.: ०२० ६६०५००००** | info@mutthafoundation.org | www.mutthafoundation.org